न हिं ज्ञानेन सदृशं पवित्रमहं विद्यते

## सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे

# श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी

बेस्ट कॉलेज पुरस्कार (ग्रामीण विभाग) मुंबई विद्यापीठ

नॅक पुर्नमुल्यांकन ए ग्रेड (3.06 सी.जी.पी.ए.)

वरिष्ठ महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान)

Best College Award



NAAC Re-accredited A Grade 3rd Cycle 3.06 CGPA

# माहितीपुस्तिका २०२२-२०२३



**Vision**


Shri Pancham Khemraj Mahavidyalaya is to be developed into Shri Pancham Khemraj University.

**Mission**

To make all round development of people of rural and remote area mainly from south konkan (Western Ghats i.e. Sahyadri) especially in the economical, cultural, ethical and industrial aspects.

# सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ

## कार्यकारी मंडळ



हिज हायनेस लेफ्ट. कर्नल स्व. श्रीमंत
शिवरामराजे भोंसले (राजेसाहेब)
संस्थापक - अध्यक्ष



हर हायनेस स्व. श्रीमंत
सत्वशीलादेवी भोंसले (राजमाता)
आमचे प्रेरणास्थान



हिज हायनेस श्रीमंत
खेमसावंत भोंसले (राजेसाहेब)
अध्यक्ष



हर हायनेस श्रीमंत
सौ. शुभदादेवी भोंसले (राणीसाहेब)
चेअरमन



युवराज
लखम खेमसावंत भोंसले
कार्यकारी विश्वस्त



युवराज्ञी
उर्वशीराजे भोंसले
विश्वस्त

**संस्थापक - अध्यक्ष - हि. हा. लेफ्ट. कर्नल स्व. श्रीमंत शिवरामराजे भोंसले (राजेसाहेब)**

**आमचे प्रेरणा स्थान- ह. हा. स्व. श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले (राजमाता)**

**तहह्यात अध्यक्ष व संस्थेचे विश्वस्त - हि. हा. श्रीमंत खेमसावंत भोंसले (राजेसाहेब)**

**चेअरमन - ह. हा. श्रीमंत सौ. शुभदादेवी भोंसले (राणीसाहेब)**

**कार्यकारी विश्वस्त - युवराज लखम खेमसावंत भोंसले**

**कार्यकारी विश्वस्त - युवराज्ञी उर्वशीराजे खेमसावंत भोंसले**

पदसिद्ध सदस्य - प्राचार्य - श्री. पं. खे. महाविद्यालय, सावंतवाडी

न हिं ज्ञानेन सदृशं पवित्रमहं विद्यते

**सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी

बेस्ट कॉलेज पुरस्कार (ग्रामीण विभाग) मुंबई विद्यापीठ

नॅक पुर्नमुल्यांकन ए ग्रेड (३.०६ सी.जी.पी.ए.)

# माहितीपुस्तिका

## वरिष्ठ महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान)

## सन २०२२-२०२३

### उपलब्ध अभ्यासक्रम

❖ **कला शाखा**

पदवीस्तर - मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र

पदव्युत्तर - एम.ए. हिंदी इंग्रजी आणि अर्थशास्त्र

❖ **वाणिज्य शाखा**

पदवीस्तर - बी.कॉम.

पदवीस्तर - बी.कॉम.(बँकिंग ॲण्ड इश्युरन्स)

पदव्युत्तर - एम.कॉम (अकौटन्सी)

❖ **विज्ञान शाखा** -

पदवीस्तर - भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. आय.टी.

पदव्युत्तर - एम.एस्सी केमिस्ट्री ॲनॅलिटिकल, झुऑलॉजी (किटकशास्त्र व समुद्रविज्ञानशास्त्र) बॉटनी (सपुष्पवनस्पती व वनस्पती मधील रसायने),

पी.एच.डी. झुऑलॉजी,बॉटनी- मुंबई विद्यापीठ

**- वर्गवेळ -**

कला व वाणिज्य शाखा स. (७.३० ते १२.३०) शास्त्र शाखा (स.१०.३० ते ५.१५)

**- कार्यालयीन वेळ -**

- कार्यालयीन कामकाजाची वेळ - स. ०९.५० ते ०५.३०
- पैशाची देवघेव वेळ - स. १०.३० ते दु.०१.३०
- टीप - दु. १.३० ते २.०० पर्यंत भोजनाची सुटटी राहील.

# पुण्यश्लोक बापूसाहेब महाराजांचे शिक्षण विषयक विचार

श्री पंचम खेमराज उर्फ बापूसाहेब महाराज यांचा जन्म २० ऑगस्ट १८९७ मध्ये ब्रिटीश राजवटीत झाला. ब्रिटीशांकडून राज्याधिकार मिळविण्यासाठी महाराजांना झगडावे लागले. वैराग्यशाली, स्थितप्रज्ञता, प्रजाहितदक्षता या त्रिसुत्रीय तत्वाचा उपयोग महाराजानी राजकारभारात केला होता. त्यामुळेच म. गांधीजींनी संस्थानांच्या भेटी प्रसंगी बापूसाहेब महाराजांचा कारभार पाहून संस्थानाचा उल्लेख 'रामराज्य' आणि बापूसाहेब महाराजांचे वर्णन 'रामराजा' असे केले होते. सावंतवाडी संस्थान उत्पन्नाचे कमी असूनही त्या उत्पन्नातील बराचसा भाग तेव्हा शिक्षणावर खर्च होत होता. संस्थानाला कै. श्रीराम उर्फ रावसाहेब कै. श्री. पंचम खेमराज उर्फ बापूसाहेब महाराज, कै. राणी पार्वतीदेवी यांच्या महान आचार विचारांचे नेतृत्व लाभले.

## सर्व सुधारणेचा पाया - शिक्षण

'सर्व विकासाचा पाया म्हणजे शिक्षण होय.' ही गोष्ट बापूसाहेब महाराजांना पूर्णपणे पटली होती. त्यामुळे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार शक्य तितका करणे हे त्यांनी आपले परम कर्तव्य मानले. शिक्षण प्रसारासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दीत खूप प्रयत्न केले. संस्थान काळात सावंतवाडी येथे हायस्कूल होते. त्याला फार मोठी परंपरा लाभली होती. शिक्षण केवळ पूस्तकी न राहता सर्वांगीण विकास साधणारे असावे, यासाठी औद्योगिक शाळांचा विकास करण्यात आला. सुतारकामा बरोबर विणकाम, मुद्रणकाम, हातमाग चालवणे, सुतकातण्याचे काम शेती व धंदे शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. हायस्कूलातील विद्यार्थ्यांनी एखाद्या तरी धंदयाचे शिक्षण घ्यावे अशी सक्ती देखील त्या काळी करण्यात आली होती.

खेळांचे वार्षिक सामने घडवून आणणे, बालवीर चळवळ, स्त्री शिक्षणाला उत्तेजन मिळावे म्हणून इंग्रजी, मराठी शाळांतील मुलींना मोफत शिक्षणाची सोय, अस्पृश्यांचा मागासलेपणा लक्षात घेवून त्यांना शिक्षणच काय परंतू शिक्षणाचे साहित्य मोफत देणे,साक्षरता प्रसारक संघ स्थापून त्यांना चालना देणे, शिक्षणाचा झालेला प्रसार टिकावा म्हणून दहा फिरत्या वाचनालयांची योजना, चांगले शिक्षण मिळावे यासाठी नॉर्मल क्लास सुरु करुन शिक्षकांना त्याव्दारे प्रशिक्षित करणे. या गोष्टी शिक्षणाच्या प्रगतीच्या नव्हे तर स्व. बापूसाहेबांच्या दुरदृष्टीच्या निदर्शकच आहेत.

# मडुरा इंग्लीश स्कूलच्या इमारत अनावरण प्रसंगी केलेले ऐतिहासिक भाषण

पुण्यश्लोक बापूसाहेब महाराजांनी सावंतवाडी संस्थानात शिक्षण प्रसारास प्राधान्य देताना अनेक जागा उपलब्ध करुन दिल्या, तर काहींना शाळेच्या इमारती करता निधीही उपलब्ध करुन दिला. संस्थानातील प्रजाजनाचे त्या काळात महाराजांना या कार्यात सहकार्यही उत्तम प्रकारे लाभले. मडुरा परिसरावर महाराजांचे विशेष लक्ष होते या परिसरात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करुन तेथील दुर्गम परिसरात इंग्रजी शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवण्याचा त्यांनी चंग बांधून सर्वांना प्रोत्साहित केले होते. आज मडूरा येथील न्यू इंग्लीश स्कूल ही प्रशाला म्हणजेच बापूसाहेब महाराजांच्या काळात सुरु केलेली प्राथमिक शाळा होय. या शाळेच्या इमारतीचे अनावरण श्रीमंत बापूसाहेब महाराजांच्या हस्ते २९ एप्रिल, १९२७ रोजी झाले. या प्रसंगी त्यांनी शाळेच्या उपक्रमामध्ये सहभागी असलेल्या सर्वांचे कौतुक तर केलेच; शिवाय अशा शिक्षण विस्तारा करिता ज्यांनी सहकार्य केले त्यांची जाणीव समाजाने ठेवली पाहिजे असे प्रतिपादन केले. आज काळाच्या ओघात या परिसरातील सर्वांनाच या सर्वाचा विसर पडलेला आहे. सामाजिक जाणिवेचे भान लोपत चालले असताना शिक्षण हेच समाजाला मुल्याधिष्ठीत जीवन पध्दती उपलब्ध करुन देईल अशी बापूसाहेब महाराजांची धारणा होती. त्यांचे मडूरा येथील इंग्लीश स्कूलच्या इमारत अनावरण प्रसंगी त्यांनी केलेले ऐतिहासिक भाषण पुढील प्रमाणे,

“सदरहू शाळा सुरु कल्यावर आपले कर्तव्य संपले असे न मानता, श्री. वालावलकर हे या शाळेच्या कामाकडे व प्रगतीकडे विशेष लक्ष देत आहेत. ही फार समाधानाची गोष्टी आहे शाळेतील मुलांना खेळण्यासाठी क्रिकेट व फुटबॉल या खेळाची साधने त्यांनी घेऊन दिली आहेत. हल्ली येथील शाळेत बालवीर संस्था सुरु झाली त्यावेळी गरीब मुलांस त्यांनी कपडयांसाठी मदत केली आहे. यावरुन असे दिसून येते की, मुलांच्या शारीरिक शिक्षणाकडे त्यांचे लक्ष आहे. हिंदुस्थानातील शिक्षण पध्दतीतील मोठा दोष म्हटला म्हणजे ते अगदी एकांगी व पुस्तकी असते. मुलांच्या शारीरिक व नैतिक विकासाकडे आजपर्यंत जवळ जवळ पुर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते; परंतु हल्ली काही वर्षे या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष जात आहे ही आनंदाची गोष्ट आहे.”

“बालवीर म्हणजे बॉयस्काऊट या चळवळीपासूनही राष्ट्राचे फार मोठे कल्याण होण्यासारखे आहे. या चळवळीमुळे लहान वयापासून मुलांना शिस्तीने व एकजुटीने वागण्याची सवय लागून स्वावलंबी होण्यास मदत होते या त्यांच्या ठिकाणी उपजत असलेल्या देशाभिमान, भुतदया वेगैरे सदगुणांचा विकास होतो. त्यामुळे ते चांगले नागरिक होतील यातशंका नाही. बॉयस्काउट शिक्षकांनीया चळवळीच्या मूळ हेतुकडे लक्ष देऊन मुलांस शिक्षण देताना त्यांच्या मनावर सदगुणांचे महत्व ठसविण्याकडे व त्यांच्या नैतिक वाढीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ”

## विद्यादान हे सर्व दानात श्रेष्ठ आहे.

विद्यादान हे सर्व दानात श्रेष्ठ आहे असे आमचा धर्म सांगतो व या प्रकारच्या दानाचे महत्व आज समाज ओळखू लागला आहे. हे राष्ट्राच्या उध्दाराचे सुचिन्ह आहे. विद्या हा राष्ट्राच्या उन्नतीचा पाया आहे. ऐहिक कल्याण सोडून देऊन पारमार्थिक कल्याणाकडे लक्ष दिले तरी अज्ञानाचा नाश होऊन ज्ञान प्राप्त होणे आवश्यक असल्यामुळे विद्यादान करण्याचे पुण्य विशेष आहे.

झटून अभ्यास करणे हे शाळेतील विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. अभ्यास करताना त्यांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. क्रिकेट, खो-खो, आटयापाटया वेगैरे खेळ खेळणे किंवा इतर काहीतरी व्यायाम नियमितपणे करतात की नाही यावर लक्ष ठेवले पाहिजे.

## शिक्षण प्रसार

प्रगत शैक्षणिक दृष्टीकोन ठेवल्यामुळे त्या काळात या भागामध्ये शिक्षणाचा पध्दतीशीर प्रचार व प्रसार झाला. संस्थानातील प्रत्येकखेडयात मराठी चौथीपर्यंत शिक्षण देणा-या शाळा स्थापन झाल्या. त्यांनी माध्यमिक शिक्षणाच्या प्रचारासाठी खूप प्रयत्न केले होते. कुडाळ - आरोंदा वेगैरे ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु झाल्या तसेच संस्थानातील मोठया वस्तीच्या गावातून इंग्रजी तिस-या इयत्तेपर्यंत शिक्षण देणा-या अँग्लोव्हर्नाक्युलर शाळा सुरु करण्यात आल्या. सावंतवाडीत मुलींसाठी मोफत हायस्कूल सुरु झाले. त्यामुळे त्यावेळी संस्थानच्या भागातील साक्षरतेचे प्रमाणे शेकडा १७% पर्यंत पोहोचले होते. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत केली होती.

## महाविद्यालयाची वाटचाल

### राणी पार्वतीदेवी कॉलेज

सावंतवाडीचे थोर राजे श्रीमंत बापूसाहेब महाराज यांचे दिनांक ४ जुलै, १९३७ साली पुणे मुक्कामी दुर्देवाने अपघाती निधन झाले. त्यावेळी युवराज शिवराम राजे भोंसले अवघे १० वर्षांचे असल्यामुळे संस्थानाचा राज्यकारभार चालविण्यासाठी स्व. राजमाता पार्वतीदेवी या स्व. श्रीमंत बापूसाहेब महाराजांच्या इच्छेनुसार सर्वाधिकार संपन्न रिजंट झाल्या, व त्यांनी स्व. बापुसाहेब महाराजांच्या ध्येय धोरणानुसार राज्यकारभार चालविण्याचे ठरविले.

आपल्या राज्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि आपल्या संस्थानातील मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी असे स्व. बापूसाहेब महाराजांना सतत वाटत असल्यामुळे राजमाता पार्वतीदेवी यांच्या प्रेरणेने सावंतवाडीत १९४५ साली राणी पार्वतीदेवी कॉलेज सुरु झाले. काही अडचणीमुळे या कॉलेजचे स्थलांतर बेळगांव येथे करणे भाग पडले. म्हणून आज बेळगांवातील ख्यातनाम राणी पार्वतीदेवी कॉलेज हे बेळगांवला सावंतवाडीने दिलेली भेट आहे असे आम्हां सावंतवाडीकरांना अभिमानाने सांगता येते.

## दक्षिण रत्नागिरी जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ

सन १९४७ मध्ये भारतातील इतर संस्थांना प्रमाणे सावंतवाडी संस्थानचेही भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रगतीचा वेग चौफेर वाढला. लोकांच्या आशा आकांक्षा उंचावल्या. शिक्षणाची वाढती मागणी पुढे येऊ लागली. अशा वेळी सावंतवाडीत उच्च शिक्षणांची गरज तीव्रतेने जाणवू लागली.

उच्च शिक्षणांची सोय करु शकेल अशी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व श्रीमंत शिवरामराजे यांची एक सदस्यीय समिती, या निर्णयाची पूर्तता करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या प्रेरणेतून सन १९६० साली दक्षिण रत्नागिरी जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ, या नावाने शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. दक्षिण रत्नागिरीतील देवगड, मालवण, वेंगुर्ला, कणकवली, कुडाळ व वैभववाडी या भागातील हुशार पण गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे हाच उददेश या संस्थेने आपल्यापुढे ठेवला होता.

## सत्यविलास पॅलेस

शिक्षण संस्था सुरु करताना तिच्यासाठी उपयुक्त इमारतीचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी दक्षिण रत्नागिरी जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार श्रीमंत स्व. शिवरामराजे भोंसले यांच्या औदार्यामुळे त्यांचा सत्यविलास पॅलेस संस्थेस लाभला. फक्त पॅलेस देऊन ते थांबले नाहीत तर त्याच्या सभोवताली असलेली सारी जमीन नाममात्र भाडयाने संस्थेला दिली. त्यामुळे संस्थेला आपल्या वाढत्या व्यापाबरोबर नवनव्या इमारतीही उभ्या करता आल्या.

अनेक उदार व्यक्ती पुढे आल्या आणि त्यांनी दिलेल्या भरघोस देणग्यांमुळे या इमारती उभारणे शक्य झाले. स्वत: राजेसाहेबांनी आपले आतेभाऊ धारचे महाराज स्व. आनंदराव पवार यांच्याकडून मोठी देणगी मिळवून एक भव्य आणि सुंदर हॉलही बांधून दिला. तसेच स्व. वसंतराव शेठ केसरकर, श्री. माधवराव मसुरकर व स्व. रामभाऊ परुळेकर यांनीही आपल्या उदार देणगीतून संस्थेला इमारती बांधून दिल्या. या सर्व व्यक्तींनी मंडळास उपकृत करुन ठेवले आहे.

महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाकडून मान्यता मिळविण्यासाठी मोठी रक्कम ठेव म्हणून विद्यापीठाकडे ठेवणे आवश्यक होते. अल्पावधीत विद्यापीठाची अट वेळेवर पूरी करणे अशक्य होते. संस्थेची ही अडचण राजेसाहेबांनी रक्कम वेळेवर उपलब्ध करुन दूर केली आणि अशा त-हेने महाविद्यालयाचा जीवन प्रवास सुरु झाला. श्रीमंत राजेसाहेबांनी सावंतवाडी परिसरातील तसेच दुरच्या भागातून येणा-या गरीब होतकरु विद्यार्थ्यांसाठी आपल्या राजवाडयाच्या परिसरात पॅलेस हॉस्टेल सुरु केले. त्यामुळे अत्यंत गरीब होतकरु विद्यार्थ्यांच्या बोर्डींगचा प्रश्न सुटायला मदत झाली. हॉस्टेलच्या ८-१० वर्षांच्या आयुष्यात येथे राहिलेल्या विद्यार्थ्यांना जेवणखाण, पुस्तके तर मिळालीच पण अभ्यासासाठी शांत प्रसन्न वातावरण व प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पुरे करण्याची संधी उपलब्ध झाली. या हॉस्टेलमधून बाहेर पडलेले उच्च विद्याविभूषित विद्यार्थी आज सरकारी व खाजगी नोकरीत मोठया हुदयावर कार्यरत आहेत.

## संस्थेचे आधारस्तंभ

### स्व.श्रीमंत शिवरामराजे भोंसले (संस्थापक अध्यक्ष)

(जन्म - १३ ऑगस्ट, १९२७, स्वर्गवास - १३ जुलै, १९९५)

श्रीमंत शिवरामराजे भोंसले यांनी या दुर्गम परिसरात शिक्षणाचा विकास केला. ते राजेसाहेब म्हणून ओळखले जात. श्री पंचम खेमराज महाविद्यालय स्थापन करुन त्यांनी येथील दुर्गम प्रदेशातील मुला - मुलींना उच्च शिक्षणाचे दालन खुले केले. आपल्या पूज्य पिताजींच्या नावाने त्यांनी उभे केलेले महाविद्यालय त्यांच्या महान पित्याचे अलौकिक स्मारक बनले आहे. त्याचबरोबर हे महाविद्यालय म्हणजे स्व. राजेसाहेबांच्या लोकोपयुक्त कार्याचे द्योतक आहे. त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात समाजकारण व राजकारण यामध्ये स्वत:ला झोकून दिले. एक आदर्श, चारित्र्यवान, निरपेक्ष, तसाच निष्कलंक नेता म्हणून ते अखेरपर्यंत ओळखले गेले. त्यांनी पाचवेळा विधानसभेवर निवडून येऊन विविध समित्यांच्या माध्यमातून अनेक लोकपयोगी कामांना चालना दिली. ते महाराष्ट्र राज्य हस्तकला महामंडळाचे १९८० ते १९९१ पर्यंत अध्यक्ष होते. त्यांनी या काळात महाराष्ट्रातील हस्तकलेचे पुनरुज्जीवन करुन तिला जगात सन्मान प्राप्त करुन दिला. एक सिंहासनाधिष्ठीत राजा असूनही त्यांनी आपल्या राजेपणाचा वा विव्दत्तेचा गर्व कधीच बाळगला नाही. सामान्यापासून असामान्यपर्यंत ते सर्वांशी अत्यंत सहजतेने आणि साधेपणाने वागून त्यांची विचारपूस करीत.

## स्व. राजमाता श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले

(जन्म २ सप्टेंबर १९३५ स्वर्गवास १८ जुलै २०१८)

राजमाता श्रीमंत सत्वशीलादेवी भोंसले या १९८१ पासून आजपर्यंत सातत्याने सिं.जि.शि.प्र.मंडळाच्या कार्याध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. महाविद्यालयाच्या कार्यक्रमामध्ये रस घेवून त्या जातीनिशी सहभागी होवून मार्गदर्शन करीत. महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्या सतत प्रयत्नशील होत्या. पेंटींग, मणीकाम, विणकाम एम्ब्रायडरी इ. हस्तकलामध्ये त्यांचा हातखंडा होता. यासाठी त्यांना अनेक राज्यस्तरीय पारितोषिके मिळालेली आहेत. आपल्या राजवाडयामध्ये गंजिफा, पेंटिंग इ. हस्तकलांमध्ये मग्न असत. तसेच त्या इतर हस्तकलाकारांना मार्गदर्शन व सहकार्य करीत.

## राजेसाहेब श्रीमंत खेमसावंत भोंसले (अध्यक्ष - सिं.जि.शि.प्र.मंडळ, सावंतवाडी)

सावंतवाडीच्या राजघराण्यातले सहावे खेमसावंत राजे आहेत. त्यांचे पूर्व माध्यमिक शिक्षण उटी मुक्कामी झाल्यावर प्राथमिक - माध्यमिक शिक्षण त्यांनी सोंडूर (कर्नाटक) येथे पूर्ण केले. श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडीमधून पदवीपूर्ण विज्ञान परीक्षा विशेष प्राविण्यासह प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सुरतकल (कर्नाटक) येथील अभियांत्रिकी कॉलेजमधून बी.टेक. ही पदवी पहिल्या वर्गात संपादन केली. १९९५ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी पहिल्या वर्गात संपादित केली. ते एक हुशार, खिलाडू व शिस्तप्रिय व्यक्ती म्हणून ओळखले जातात. व्यायाम, नेमबाजी, बॉडी बिल्डींग इत्यादी क्षेत्राबददल त्यांना विशेष आवड आहे. त्यांना संगणक तंत्रज्ञानाची सखोल जाण आणि आवड आहे.

## श्रीमंत युवराज लखमराजे भोंसले (कार्यकारी विश्वस्त)

प्राथमिक शिक्षण बेळगांव येथे तसेच ज्युनिअर कॉलेजचे शिक्षण हसाराम रिझुमल महाविद्यालय, चर्चगेट मुंबई येथून पूर्ण केले. दादर, मुंबई येथून त्यांनी Indian Institute of Hotel Management मधून पदवी संपादन केली. त्यानंतर Culinary Institute of America मधून बेकिंग आणि पेस्ट्री ची २ वर्षाची असोसिएट Degree घेतली आहे.

## श्रीमंत सौ.शुभदादेवी खेमसावंत भोंसले राणीसाहेब (चेअरमन व विश्वस्त)

जे.जे.स्कूल ऑफ आर्टस, मुंबई मधून इंटेरिअर डेकोरेशनचा अभ्यासक्रम पुर्ण केला आहे. त्या रोटरी एक्सचेंज कार्यक्रमाच्या निमित्ताने ऑस्ट्रेलियामध्ये ०१ वर्ष वास्तव्यास होत्या. त्यांनी मलेशिया, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, अमेरिका, नेपाळ, दुबई इ. देशांचे अभ्यास दौरे केले आहेत. त्यांना कलाक्षेत्राची विशेष रुची आहे. त्या सावंतवाडी लॅकरवेअर्सच्या भागीदार आहेत. श्रीमंत राणीसाहेब संस्कारक्षम आणि दर्जेदार शिक्षणाच्या पुरस्कर्त्या आहेत .

## श्रीमंत युवराज्ञी उर्वशीराजे भोंसले (विश्वस्त)

युवराज्ञी उर्वशीराजेचे प्राथमिक शिक्षण जोझोपसकॉन्व्हेंटस पाचगणी येथे झाले ११ वी १२ वीचे शिक्षण जोती निवास बेंगलोर येथे झाले. पदवीचे शिक्षण बॅचलर ऑफ अकौन्टींग फायनान्स हसाराम रिझुमल महाविद्यालय, चर्चगेट मुंबई येथून पूर्ण केले. त्यांनी मास्टर्स इन कार्बन फायनान्स ही डिग्री एडीनबर्ग विद्यापीठ, स्कॉटलंड येथून संपादित केली आहे.

## श्री पंचम खेमराज महाविद्यालय

हि.हा.स्व.शिवरामराजे भोंसले यांनी गोरगरिबांच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, या उददेशाने सन १९६१ मध्ये हे महाविद्यालय केवळ १०० विद्यार्थ्यांवर सुरु केले. आज या महाविद्यालयात २५०० हून अधिक विद्यार्थी कला, वाणिज्य तसेच विज्ञान, पदवी व पदव्युत्तर विभागात शिक्षण घेत आहेत. आज हे महाविद्यालय संपूर्ण कोकणात एक आदर्श, दर्जेदार व शिस्तप्रिय महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या महाविद्यालयात जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. महाविद्यालयास २००५-०६ साली मुंबई विद्यापीठाने ग्रामीण भागातील बेस्ट कॉलेज म्हणून गौरविले आहे. राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) बेंगलोर या संस्थेकडून मे २०१९ दि. ७ व ८ रोजी महाविद्यालयाचे पुर्नमुल्यांकन झाले. नॅकच्या या तिस-या फेरीत मुल्यांकनाची नवीन पध्दत अवलंबली आहे. या मुल्यांकनामध्ये महाविद्यालयास 'अ' श्रेणीसह सी.जी.पी.ए. ३.०६ गुण मिळाले.

आज महाविद्यालयाचा भौतिक कायापालट होत असताना रसायनशास्त्र विभागाची पदव्युत्तर प्रयोगशाळा, भौतिकशास्त्र,प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभागाच्या आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेल्या प्रयोगशाळा, अद्ययावत असे संगणक कक्ष, अद्ययावत जिमनॅशियम, शुटींग रेंज, मुलींच्या वसतीगृहाचा विकास व भव्य सभागृह, कार्यालयीन संगणकीकरण सूसज्ज इमारत महाविद्यालयाच्या आवारातील अंतर्गत रस्ते असे अनेक प्रकल्प पूर्णत्वास आलेले आहेत. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, योगा आणि ध्यानधारणा, करिअर मार्गदर्शन केंद्र, कौशल्य विकास केंद्र, ई केंद्र, नवोपक्रम विकास केंद्र, नोकरीसंदर्भात मार्गदर्शन या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय अविरत प्रयत्नशील आहे.

संस्थेचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोंसले, स्व. राजमाता सत्वशीलादेवी भोंसले, चेअरमन श्रीमंत शुभदादेवी भोंसले तसेच युवराज लखमराजे भोंसले व नियामक मंडळाचे सदस्य यांच्या मार्गदर्शनाने शैक्षणिक व भौतिक विकासाकडे विशेष लक्ष केंद्रीत केलेले आहे.

सध्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील सेवा आणि सुविधा उपलब्ध आहेत.

## श्रीमंत राणी पार्वतीदेवी साहेब ग्रंथालय व अभ्यासिका

महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ५५,००० हून अधिक पुस्तके आहेत. तसेच ४४ जर्नल्स, N-LIST व Institutional Repository च्या माध्यमातून ई - बूक व ई - जर्नल्स मिळविता येतात. वाचकांसाठी मुक्तदार पध्दतीचा (Open accesss) वापर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी पुस्तके देव-घेव करण्यासाठी बारकोड तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे व OPAC च्या सहाय्याने पुस्तके शोधता येतात.

## जिमखाना/जिमनॅशियम

क्रीडा विभागात अनेक खेळांची सोय उपलब्ध आहे. सुसज्ज जिमनॅशियम, व्यायाम, खेळ वगैरे बाबत प्रशिक्षित प्रशिक्षकांचे मार्गदर्शन गरजेनुसार उपलब्ध करुन दिले जाते. विशेष क्रीडा नैपुण्य दाखविणा-यांना विद्यार्थ्यांना फी नादारी तसेच इतर आर्थिक सवलती वा सहाय्यासाठी विचार केला जातो.

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेला अनन्यसाधारण महत्व दिले जात आहे. विद्यार्थी स्वयंसेवकांनी शिक्षणाबरोबर समाजकार्यही करावयाचे आहे. या योजनेव्दारे कला, पथक, नियोजनाअंतर्गत दत्तक खेडे, ग्रामोव्दार, व वृक्षारोपण इत्यादी कार्यक्रम पार पाडले जातात. वर्षभरात नियमाप्रमाणे १२० तास समाजकार्य करणा-या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठातर्फे प्रमाणपत्र व परीक्षेमध्ये १० अतिरिक्त गुणांचा फायदा मिळतो.

## राष्ट्रीय छात्र सेना NCC (विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याकरीता)

महाविद्यालयीन जीवनात व्यक्तीमत्व विकासालाही महत्व आहे. या दृष्टीने महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागांतर्गत आर्मी तसेच नेव्ही विभाग कार्यरत आहेत. प्रत्येकी ४५ विद्यार्थ्यांना यामध्ये प्रवेश दिला जातो. नोकरीच्या, मुलाखतीच्या वेळी उमेदवारांची निवड करताना राष्ट्रीय छात्र सेना सी प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. बी व सी प्रमाणपत्र उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळते.

## आजिवन अध्ययन कार्यविस्तार (DLLE)

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांना आणि व्यक्तिमत्व गुणांना वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समस्यांची जाणीव होण्यासाठी व विद्यार्थी समाजाभिमुख बनविण्याच्या हेतूने हा विभाग कार्यरत आहे. या विभागाच्या उपक्रमांमध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी १० श्रेयांकांचा लाभ घेता येतो.

## विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार

भांडारात स्टेशनरी, निरनिराळे फॉर्म, टयूटोरीयलसाठी वहया, जर्नल्स इ. शिक्षणोपयोगी साहित्य मिळते त्याचा विद्यार्थ्यांना अधिकाधिक फायदा होतो.

## विद्यार्थी सहाय्यक निधी (SAF)

या योजनेअंतर्गत हुशार, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तके, स्टेशनरी, परीक्षा फी वेगैरेसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. या करिता विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांकडे अर्ज करावा. यासाठीचे अर्ज विद्यार्थी ग्राहक भांडारात उपलब्ध असतात.

## राजमाता शांतादेवी गायकवाड, बडोदे मुलींचे वसतीगृह

महाविद्यालयाच्या परिसरात सर्व सोयींनी युक्त असे मुलींचे वसतीगृह उभे करण्यात आले आहे. सर्व सुविधांनी युक्त अशा या वसतीगृहातील निवासाकरिता फर्स्ट कम फर्स्ट या तत्वावर प्रवेश देण्यात येतो. वसतीगृहात प्रवेश घेऊ, इच्छिणा-या विद्यार्थीनींनी अथवा त्यांच्यापालकांनी प्रवेशाकरिता मा. प्राचार्यांशी संपर्क साधावा.

## दुर व बहि:स्थ शिक्षण विभाग (IDOL)

या उपक्रमांतर्गत बहि:स्थ स्वरुपातील मुंबई विद्यापीठाचे अभ्यासक्रम राबविण्याकरिता महाविद्यालयात सोय केली आहे. यामुळे परिसरातील नोकरी व्यवसाय करणा-या युवावर्गास उच्च शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र

या परिसरातील विद्यार्थ्यांना फावल्या वेळेत उच्च शिक्षण व संशोधन स्वरुपाचे अभ्यासक्रम पुरे करता यावेत या उददेशाने य.च.म.मु. विद्यापीठाने ही ज्ञानगंगा या परिसरात आणण्याचे काम संस्थेने केलेले आहे. या अभ्यासक्रमाचा लाभ शिक्षण घेता दुसरी एखादी पदवी घेता येणे तसेच नोकरी वा व्यवसाय करणा-या प्रौढ वर्गास मोठया प्रमाणात झालेला आहे. या अभ्यासक्रमांच्या बरोबर अधिक माहिती करिता केंद्र संयोजक यांच्याशी संपर्क साधावा. या अभ्यासक्रमाचे स्वरुप पुढीलप्रमाणे महाविद्यालयामध्ये या अंतर्गत **B.A. Journalism** हा अभ्यासक्रम सुरु आहे.

## प्रवेश प्रक्रिया

### प्रवेशाबाबतच्या सुचना

**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठाचा online form भरावयाचा आहे. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा online form www.mum.digitaluniversity.ac.in या संकेत स्थळावरून Pre-Admission Online Registration मध्ये जावून भरावयाचा आहे. फक्त द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी याच संकेत स्थळावरून मुंबई विद्यापीठाचा PRN NO टाकून भरणे आवश्यक आहे. PRN NO विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर मिळेल.**

### तात्पुरता प्रवेश

अन्य ठिकाणी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश घेता येतो. तथापी अशा विद्यार्थ्यांना संपूर्ण फी भरावी लागते.

### प्रवेशासाठी जोडावे लागणारे दाखले

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए.,/बी.कॉम.,/बी.एस्सी. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्जासोबत पुढीलप्रमाणे दाखले जोडावे लागतात.

१) कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखला व त्याची साक्षंकित प्रत.उच्च माध्यमिक परीक्षेचे मुळ गुणपत्रकाच्या ३ साक्षांकित प्रती. **(प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकरिता)**

२) इतर राज्यातून येणा-या विद्यार्थ्यांनी Leaving/Transference certificate, 10th व 12th Mark List, १२th Passing Cert,Migration Certificate,Document Verification (original)with

zerox 3 प्रतीत सादर करणे. हा प्रवेश तात्पुरत्या स्वरुपाचा असून सदरची कागदपत्रे जोडल्याशिवाय मुंबई विद्यापीठाकडून प्रवेश कायम केला जात नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## (प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकरिता)

3) द्वितीय वर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेमी १ व २ व तृतीय वर्षाकरिता सेमी १,२,३ व ४ची गुणपत्रिकेच्या साक्षांकीत प्रती.
द्वितीय व तृतीय वर्गात अन्य महाविद्यालयातून प्रवेश घेणाऱ्यांनी प्रवेश अर्जासोबत online Transference Certificate जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपला प्रवेश कायम होणार नाही.
सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत आधार कार्ड जोडणे आवश्यक.

४) मागास वर्गीय (SC/ST/DT/NT/SBC/OBC) व ESBC (आर्थिकदृष्ट्या मागास)विद्यार्थी असल्यास जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत)

जे विद्यार्थी जातीचा दाखला जोडून प्रवेश घेणार आहे.अशा विद्यार्थ्यांनी MAHADBT या website सुरू झाल्यानंतर scholarship चा online अर्ज भरून योग्य त्या कागदपत्रासोबत कार्यालयात सादर करावयाचा आहे. जे विद्यार्थी scholarship चा online form भरणार नाही त्यांना पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी

Open category चे विद्यार्थी राजश्री छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना (EBC) या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेचा लाभ दोन अपत्यापर्यंतच अनुज्ञेय आहे. या विद्यार्थ्यांनी देखील scholarship चा online अर्ज भरून योग्य त्या कागदपत्रासोबत कार्यालयात सादर करावयाचा आहे. जे विद्यार्थी scholarship चा online form भरणार नाही त्यांना पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या मुलांनी सवलतीच्या अर्जासोबत गुणपत्रिक, आधारकार्ड,रेशनिंग कार्डची छायांकित प्रत दोन प्रतीत कार्यालयात जमा करावयाची आहे. (अर्ज कॉलेज ग्राहक भांडारात मिळेल).ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न रु. ८,००,००० पेक्षा कमी असेल त्या विद्यार्थ्यांच्या ई.बी.सी.फी. माफीसाठीचा अर्ज सादर करताना पुढील कागदपत्रांची पूर्तता करावी.

- मे. तहसिलदार यांनी दिलेल्या सन २०२१-२०२२ च्या उत्पन्नाच्या दाखल्याची छायांकित प्रत (मर्यादा ८ लाखापर्यंत)
- वय आणि अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- आधारकार्डची छायांकित प्रत.
- रेशनिंग कार्डची छायांकित प्रत सदर योजनेचा लाभ दोन अपत्यांपर्यंतच अनुज्ञेय आहे.
- मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत
- संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकची प्रथम पृष्ठांची छायांकित प्रत आधारकार्ड लिंक असलेले बँक पासबुक
- शैक्षणिक खंड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी Gap Certificate
- प्रवेश पावती/परीक्षा पावतीची छायांकित प्रत.

विद्यार्थी/पालक यांच्याकडे खालीलपैकी एक वा अधिक गोष्टी असल्यास शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/२०११/ई.बी.सी./प्र.क्र.७४/मशि.२/२५-०५-२०१२ दि. ७/०६/२००२ नुसारविद्यार्थी ई.बी.सी.सवलत मिळण्यास अपात्र ठरतात.

५) बी.एस्सी. आय.टी. व बी.एस्सी. संगणकशास्त्र शाखेमध्ये प्रवेश घेताना इ. १२ वीमध्ये गणित विषयासह शास्त्र शाखेत ४५% पेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

६) विद्यापीठ एनरोलमेंट अर्ज हा ऑनलाईन भरावयाचा आहे.अर्ज भरण्याची जबाबदारी ही सर्वस्वी त्या विद्यार्थ्याची राहणार आहे.

१) विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक शाखा व विषय निवडावेत. प्रवेश घेतल्यावर शाखा व विषय बदलता येणार नाहीत. विशिष्ट अशा परिस्थितीत शाखा व विषय बदलून देण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहील. त्यासाठी नियमानुसार शाखा/विषय बदल फी भरावी लागेल.

## महाविद्यालयात उपलब्ध असणारे अभ्यासक्रम आणि विषय

| अनुदानीत | | | विना अनुदानीत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बी.ए. | बी.कॉम. | बी.एस्सी. | बी.कॉम. | बी.एस्सी. | एम.ए. | एम.कॉम. | एम.एस्सी. |
| मराठी | ॲडव्हान्स अकौंन्टसी | वनस्पतीशास्त्र | बँकीग ॲण्ड इन्श्युरन्स | संगणकशास्त्र | हिंदी | ॲडव्हान्स अकौंन्टसी | वनस्पतीशास्त्र |
| हिंदी | व्यवसाय व्यवस्थापन | रसायनशास्त्र | | माहिती व तंत्रज्ञान | इंग्रजी | | रसायनशास्त्र |
| इंग्रजी | | भौतिकशास्त्र | | | अर्थशास्त्र | | प्राणीशास्त्र |
| अर्थशास्त्र | | प्राणीशास्त्र | | | | | पी.एच.डी. |
| भूगोल | | गणित | | | | | |
| मानसशास्त्र | | वनस्पतीशास्त्र | | | | | पी.एच.डी. |

विद्यार्थ्यांनी उपलब्ध अभ्यासक्रमातून एक ग्रुप निवडावयाचा आहे.

## उपलब्ध अभ्यासक्रम (पदवीस्तर) अनुदानित

## FACULTY OF ARTS

### F.Y.B.A. Sem I and Sem II

Group I - Marathi/Hindi-CS - Economics- Geography-Marathi - FC/NCC Studies/NSS Studies

Group II - Marathi/Hindi-CS-English (Intro to Literature.)/Psychology/Hindi- FC/NCC Studies/NSS

Group III - Marathi/Hindi-CS- Geography/ Economics/ English (Introduction to Literature.) FC/NCC Studies/NSS Studies

Group IV - Marathi/Hindi-CS- - Psychology /Hindi/Marathi - FC/NCC Studies/NSS Studies

***Note –** 1) Student have to opt.one group combination from above combinations.

2) Student have to opt. either Marathi or Hindi as compulsory language.

3) Student have to opt. one course from Foundation Couse/NCC/NSS Studies.

## S.Y.B.A. Sem III and Sem IV

Group I - B.C./Demography/Psy.of Adjustment-Eco- Geo-Mar - FC/NCC Studies/NSS Studies

Group II - B.C./Demography/Psy.of Adjustment-Eco-Hin- Geo- FC/NCC Studies/NSS Studies

Group III - B.C./Demography/Psy.of Adjustment-Eco-Eng-Mar- FC/NCC Studies/NSS Studies

Group IV - B.C./Demography/Psy.of Adjustment- Eng-Hin-Psy- FC/NCC Studies/NSS Studies

Group V - B.C./Demography/Psy.of Adjustment- Geo-Hin-Psy- FC/NCC Studies/NSS Studies

Group VI - B.C./Demography/Psy.of Adjustment- Eng-Mar-Psy- FC/NCC Studies/NSS Studies

*** Note -** 1) Student have to Select/Opt. **ONE** group from above combinations.

## T.Y.B.A. Sem V and Sem VI

Marathi/Hindi/English/ Economics/Geography/Psychology

***Note** : 1) Select any **ONE** (6 unit)or any **TWO** (3 unit) of the above subject.

# FACULTY OF COMMERCE

## F.Y.B.Com Sem I and Sem II

| | |
|---|---|
| AFM – I, Com- I, B.C., B.Eco – I, ES, MST, | - Compulsory Subject |
| FC/NCC Studies/NSS Studies | - Any One |

## S.Y.B.Com Sem III and Sem IV

| | |
|---|---|
| AFM – II, Com- II, B.Law, B.Eco – II, | - Compulsory Subject |
| Adv or CSP, | - Any One |
| Mgt. ACC. (FAA – III)/MKT.MGT. (BM – III) | - Any One |
| FC/NCC Studies/NSS Studies | - Any One |

## T.Y.B.Com Sem V and Sem VI

| | |
|---|---|
| MHRM, B.Eco – III | - Compulsory Subject |
| FAA – I & II or BM – I & II | - Any Two |
| Ent. & MSSI or Marketing Reasearch | - Any One |
| Psy. of Human Behaviour at work or Lit. in Marathi | - Any One |

## FACULTY OF SCIENCE

### F.Y.B.Sc Sem I & Sem - II

Group – I Chemistry, Physics, Math., FC/NCC Studies/NSS Studies

Group – II Chemistry, Botany, Zoology, FC/NCC Studies/NSS Studies

### S.Y.B.Sc Sem III & Sem - IV

Group – I Chemistry, Physics, FC/NCC Studies/NSS Studies

Physics, Mathematics, FC/NCC Studies/NSS Studies

Group – II Chemistry, Botany, FC/NCC Studies/NSS Studies

Chemistry, Zoology, FC/NCC Studies/NSS Studies

Botany, Zoology, FC/NCC Studies/NSS Studies

### T.Y.B.Sc Sem V & Sem - VI

Physics/Chemistry/Zoology/Botany

# उपलब्ध अभ्यासक्रम (पदवीस्तर) विनाअनुदानित

## BACHELOR OF COMMERCE (Banking & Insurance)

### F.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem I

EMFS, PM, FA – I,BC – I,B.Eco – I, QM – I, - Compulsory Subject

FC - I/NCC Studies - I/NSS Studies – I - Any One

### F.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem II

PPBI,B.Law, F.A. – II, B.C. – II, OB, QM – II, - Compulsory Subject

FC - II/NCC Studies - II/NSS Studies - II

### S.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem III

FM – I, Mgt.Acc., MFM, ITBI – I, Fin. Mkt., Direct Tax., - Compulsory Subject

FC – III (An overview of Banking Sector)/NCC Studies - III/NSS Studies – III - Any One

### S.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem IV

FM - II, Cost Acc., CRM, ITBI – II, CSL, B.Eco - II, - Compulsory Subject

FC - IV(An overview of Banking Sector)/NCC Studies - IV/NSS Studies - IV - Any One

## T.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem V

FRA, AUD – I, SM, BECG, IBF, RM

## T.Y.B.Com (Banking & Insurance) - Sem VI

SAPM, Aud. – II, HRM, IB, CB, Project Work in B & I.

# BACHELOR OF SCIENCE (Computer Science)

## F.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –I

Computer Organization and Design, Programming with Python-I, Free and Open Source Software, Database Systems, Discrete Mathematics, Descriptive Statistics and Introduction to Probability, Soft Skill Development

## F.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –II

Programming with C, Programming with Python– II, Linux, Data Structures, Calculus, Statistical Methods and Testing of Hypothesis, Green Technology

## S.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –III

Theory of Computation, Core JAVA, Operating System, Database Management Systems, Combinatorics and Graph Theory, Physical Computing and IoT Programming, Web Programming

## S.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –IV

Fundamentals of Algorithms, Advanced JAVA, Computer Networks, Software Engineering, Linear Algebra using Python, NET Technologies, Android Developer Fundamentals

## T.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –V

Artificial Intelligence, Linux Server Administration, Software Testing and Quality Assurance **Elective-I(SelectAnyTwo)**

Information and Network Security, Architecting of IoT, Web Services **Elective-II (SelectAnyTwo)**

**Skill Enhancement -** Game Programming

## T.Y.B.Sc. (Comp.Sci.) Sem –VI

Wireless Sensor Networks and Mobile Communication, Cloud Computing, Cyber Forensics, **Elective-I(SelectAnyTwo)**

Information Retrieval, Digital Image Processing, Data Science **Elective-II(SelectAnyTwo)**

**SkillEnhancement -** Ethical Hacking

## BACHELOR OF SCIENCE (Information Technology)

**F.Y.B.Sc. IT Sem – I**

Imparative Programming, Digital Electronics, Operating Systems,

Discrete Mathematics, Communication Skills

**F.Y.B.Sc. IT Sem – II**

Object Orientd Programming, Microprocessor Archiitecture,

Web Programming, Numerical & Statiistical Method, Green Computing

**S.Y.B.Sc. IT Sem – III**

Python Programming, Data Structure, Computer Networks,

Database Management Systems, Applied Mathematics

**S.Y.B.Sc. IT Sem – IV**

Core Java, Intro.to Embedded Systems, Compu. Oriented Statistical

Techniques, Software Engineering, Computer Graphics & Animation

**T.Y.B.Sc. IT Sem – V**

Software Project Management, Internet of Things, Advanced Web Programming – Compulsory

Artificial Intelligence or Linux System Administration,

Enterprise Java or Next Generation Technologies

**T.Y.B.Sc. IT Sem – VI**

Software Quality Assurance, Security in Computing, Business Intelligence - Compulsory

Principles of Geographic Information Systems, Or Enterprise Networking,

IT Service Management or Cyber Laws & Advanced Mobile Programming (Practical)

**(Fifth & Six Semester Subject May Change as per University Rules).**

# उपलब्ध पदव्युत्तर अभ्यासक्रम (विना अनुदानित)

